

श्रीकांत वाघ

खरे तर मला स्वत:विषयी सांगायला आवडत नाही. पण माझी ही कथा अनेकांपर्यंत पोचावी ही इच्छा स्वस्थ बसू देत नव्हती. लोक आत्मचरित्र का लिहितात? स्वत:च स्वत:च्या आयुष्याकडे मागे वळून पाहण्यासाठी की त्यातून इतरांनी काही बोध घ्यावा अशा अपक्षेने? ते काहीही असो, मी ज्ञानमार्गावरून चालणारा एक आनंदयात्री आहे. पंढरीची ओढ असलेला वारकरी जसा आत्मविश्वासाने आणि निष्ठेने अवघड वाटेची पर्वा न करता देहभान विसरून चंद्रभागेचा तीर गाठतो, तशाच तन्मयतेने गाण्याचा अभ्यास करत मी आज ईप्सित मुक्कामी येऊन पोहोचलो आहे. नऊ वर्षांच्या अभ्यासानंतर मिळणारी हिंदुस्थानी संगीतातील 'संगीत-अलंकार' ही पदव्युत्तर पदवी यंदा मला वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी मिळाली.

माणसाच्या आशा-आकांक्षा, आवडी-निवडी यांची पाळेमुळे खूप खोलवर बालपणीच्या संस्कारात रुजलेली असतात. त्या दृष्टीने मी भाग्यवानच म्हणायचा. माझी आई मंडळात वगैरे गात असे. त्यामुळे लहानपणापासूनच माझा गाण्याकडे ओढा होता. आईच्या प्रोत्साहनामुळे शाळेतही स्पर्धा आणि कार्यक्रमांमध्ये हिरीरीने भाग घेऊन मी गात असे. तो रेडिओचा जमाना होता. रेडिओवरील गाणी मन लावून ऐकायची. कागदावर नीट उतरवून घ्यायची, अनेक वेळा सराव करायचा आणि गायची असा मला छंदच होता. आईचे प्रोत्साहन होतेच. शाळेतही बक्षिसे मिळायची. त्यामुळे नवनवी गाणी बसवायला आणखी हुरूप येई.

पुढे कॉलेजातही गाण्याचा छंद जोपासत राहिलो. तसा मी स्वभावत: शिस्तप्रिय. कोणतीही गोष्ट तन्मयतेने करण्याची मूलभूत प्रवृत्ती. त्यामुळे कोणत्याही विषयाचा सुरवातीपासून सखोल अभ्यास होत असे. शाळेपासूनच हुशार विद्यार्थ्यांत गणना होत असल्याने आणि वैद्यकीय व्यवसायाकडे ओढा असल्याने ७० साली पुण्याला आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला. मेडिकलच्या परीक्षा तेव्हा दीड-दीड वर्षांनी असत. त्यामुळे दोन परीक्षांच्या मध्ये सुमारे वर्षभर गाणे शिकता येई. शास्त्रीय गाणे शिकल्याशिवाय पर्याय नाही असे तेव्हा वाटे. त्यामुळे अधूनमधून शास्त्रीय संगीत शिकण्याचा प्रयत्न केला. परीक्षा जवळ आली की शिकवणी बंद. परीक्षेनंतर सुट्टी संपवून पुण्याला परतलो की पुन्हा भूप-यमनपासून सुरुवात होई. कॉलेजातले विविध सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे गाण्याची पर्वणीच. खोलीतल्या एका छोट्या रेडिओवर ऐकून गाणी बसवली जायची. रेकॉर्ड लायब्रऱ्याही नव्यानेच सुरू झाल्या होत्या. एखादे गाणे आवडले की तिथे चार आणे देऊन पुन्हा ऐकायला मिळत असे. त्या काळात वैयक्तिक बक्षिसेही पुष्कळ मिळाली. पं. वसंतराव देशपांडे यांच्यासारख्या महान कलावंताच्या हस्ते 'कालिदास करंडक' मिळण्याचे भाग्य लाभले. त्यानंतर नामवंत संगीत दिग्दर्शक राम कदम यांच्या दिग्दर्शनाखाली सिनेमासाठी गाण्याची संधीही चालून आली होती. नेमके तेव्हाच मुंबईला रेकॉर्डिस्ट संपावर गेले आणि मीही पुढे शिक्षणासाठी मुंबईला गेलो.

मुंबईला आधी वरळीच्या पोद्दार कॉलेजात आयुर्वेदाच्या पदव्युत्तर पदवीचा अभ्यास झाला. त्यानंतर आईच्या इच्छेखातर एम.बी.बी.एस. करायचे ठरले ते पुढे नायर हॉस्पिटलमध्ये टोपीवाला कॉलेजात झाले. त्या परीक्षा दर सहा महिन्यांनी

असत. वडिलांवरचा खर्चाचा भार कमी व्हावा म्हणून दोन परीक्षांमध्ये तीन चार महिने एखाद्या छोट्या हॉस्पिटलमध्ये रात्रपाळीची नोकरी करीत असे. तिथेच रेडिओवर गाणी ऐकत परीक्षेचा अभ्यास चाले. गाण्याचा एवढाच काय तो संबंध राहिला. एम.बी.बी.एस.नंतर पुढे एम.डी.ला ॲडमिशन मिळाली. आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही शास्त्रात मेडिसीन या एकाच विषयात पदव्युत्तर होण्याची महत्त्वाकांक्षा अशा तऱ्हेने सफल झाली. एम.डी. करताना हॉस्टेलवर राहावे लागे. वॉर्डातले काम संपवायला दिवस पुरत नसे. कधी थोडी सवड मिळाली तर बसने घरी येऊन आईच्या हातचे जेवण, एवढाच काय तो विरंगुळा. गाणेबिणेतर दूरच.

एम.डी. झाल्यावर आईने मोठ्या कौतुकाने मला तबला-पेटी बक्षीस दिली. जणू काही विसरलेल्या गाण्याची आठवण आणि पुन्हा गाणे सुरू करण्याचा आदेशच. पण तसे लगेचच व्हायचे नव्हते. मुंबईला वर्षभर नोकरी झाली. लग्न झाले. ८४ साली पुण्याला स्वत:चे क्लिनिक घेऊन प्रॅक्टिस सुरू झाली. व्यवसायाचा जम बसण्यात काही वर्षे गेली. जागा पुरेना म्हणून नवी मोठी जागा घेऊन तेथे क्लिनिक हलवले. प्रॅक्टिस जोरात होती. संसार, मुले, त्यांचे शिक्षण, मेडिकल असोसिएशनची कामे, विद्यापीठ आणि महाविद्यालयातल्या जबाबदाऱ्या असे सारे निभावून नेण्यात काळ पुढे कसा सरकत गेला ते कळलेच नाही. तरीही अधूनमधून गाण्याच्या घरगुती मैफिली होत. मध्यंतरी वर्ष दोन वर्ष एक संगीतशिक्षकही घरी येत. हे गृहस्थ वेळेला आणि हिशेबाला अत्यंत चोख. तासभरातला बराचसा वेळा मराठी गाणी शिकवण्यात घालवायचे. ती गाणी खरे तर त्यांच्यापेक्षा मला जास्त चांगली गाता येत असत. पुढे त्यांची माझी वेळ जमेना आणि ती शिकवणीही बंद पडली. आपले गुरू आपल्यापेक्षा वयाने मोठे असले पाहिजेत असे मला तेव्हा प्रकर्षाने वाटे.

अशीच वयाची पंचेचाळिशी येऊन ठेपली. आता मात्र गाण्याची ऊर्मी स्वस्थ बसू देईना. आपण जी गाणी गातो त्यासाठी स्वरांची समज आणखी वाढायला पाहिजे, गळा गरजेनुसार वळायला पाहिजे आणि आवाजाची गुणवत्ता सुधारली पाहिजे असे सारखे वाटे. माझा मूळचा आवाज जरा जाडसर. संस्कृत भाषेच्या अभ्यासामुळे उच्चारही जास्त सुस्पष्ट. वरच्या स्वरांना ओरडल्यासारखे वाटे. त्यामुळे काहीतरी करून तो सुधारणे आवश्यक होतेच. अखेर मनाचा निश्चय करून ९८ साली दसऱ्याचा मुहूर्त साधून पं.ना.वा. दिवाण यांच्याकडे शास्त्रीय संगीताची रीतसर शिकवणी सुरू केली. ग्वाल्हेर घराण्यातल्या केशवबुवा इंगळे यांचे ते पट्टशिष्य. केशवबुवा उर्फ नाना यांची आई ही माझ्या आजीची बहीण. त्यांचे वडील गुंडूबुवा इंगळे हे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे शिष्य. गुरुजींकडे गाणे शिकू लागलो तेव्हा घराण्याचे गाणे समजण्याइतकी समज मला नव्हती. कर्मधर्मसंयोगाने आपण कोणत्यातरी गुरूचे शिष्य बनतो आणि मग त्या गुरूचे घराणे हे आपले घराणे बनते. ग्वाल्हेर घराण्याचे गाणे सहज, सुंदर आणि मोकळे असते. त्यांचे रागही संगीत शिक्षणास पायाभूत असेच असतात. स्वरलयींचा उत्तम मेळ साधणारी, समजायला सोपी अशी अत्यंत प्रासादयुक्त ग्वाल्हेर गायकी आत्मसात केल्याशिवाय स्वतंत्र शैलीने गाणे शक्य नाही असे आता मला वाटते. माझे नशीब चांगले म्हणून मी ग्वाल्हेर गायकीच्या प्रवाहात आलो.

गुरुजींकडच्या शिक्षणाचे लगेचच प्रत्यंतरही आले. चार-पाच महिन्यातच 'सूर-संवर्धन' आणि 'जयवंतराव मिरजकर' स्पर्धात मला बक्षिसे मिळाली. 'पूर्तता माझ्या व्येथची' ही माझी अत्यंत आवडती गझल. पं. हृदयनाथ मंगेशकरांची अवघड चाल मी लीलया गाई. त्या गाण्याला सूर संवर्धनचे बक्षीस मिळाले. दुसऱ्या स्पर्धेला माझी पाच वर्षांची मुलगी प्रेक्षकांत बसली होती. तिच्याकडे पाहून 'दाटून कंठ येतो' हे वसंतराव देशपांड्यांचे गाणे गाताना मी इतका भावुक झालो होतो की फक्त रडायचेच बाकी राहिले होते! स्पर्धांमधल्या बक्षिसांनी नवा आत्मविश्वास दिला. याच उत्साहात गाण्यांचे कार्यक्रम सादर करण्यासाठी 'गीतरंग' ही नवी संस्था सुरू केली. अशा कितीतरी संस्था अळवावरच्या पाण्याप्रमाणे येतात आणि जातात अशी एका वादक मित्राने तेव्हाच जाणीव करून दिली होती. पण उत्साहाच्या भरात मी तेव्हा त्याकडे कानाडोळा केला.

'गीतरंग'चा पहिला कार्यक्रम टिळक स्मारक मंदिरात झाला. सारे गायक वैद्यकीय व्यवसायातलेच असावेत असा माझा आग्रह होता. वादक मात्र सारे व्यावसायिक जमवले होते. कार्यक्रम हाऊसफुल होता. डॉ. जब्बार पटेल तेव्हा प्रमुख पाहुणे होते. एवढे मोठे कलावंत. माझ्या एका डॉक्टर मित्राचे ते मित्र. त्यांच्या गाडीतून पुण्याला येताना पूर्वी आमच्या तासभर गप्पा झाल्या होत्या. तेवढ्या ओळखीवर ते माझ्या आग्रहाखातर आले. कदाचित डॉक्टर कलावंतांना उत्तेजन देण्यासाठी असेल. त्यांनी तो कार्यक्रम संपूर्ण ऐकला आणि भरभरून दाद दिली. त्यांच्या कौतुकाने उत्साह आणखी वाढला. गाण्याचे जणू वेडच लागले. एक मोठी म्युझिक सिस्टिम घेतली. अनेक कॅसेट्स जमवल्या. सतत नवनवीन गाणी ऐकायची, त्यातली आवडतील ती निवडून इतर गायकांकडून बसवून घ्यायची आणि नवनव्या विषयांवरच्या गाण्यांचे तिकीट लावून कार्यक्रम करायचे, असे सत्र सुरू झाले. 'भक्तीचा मळा', 'अनोखे बाबूजी', 'मिले सूर मेरा तुम्हारा' असे वेगवेगळे कार्यक्रम झाले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एक स्पर्धा आयोजित केली होती. त्यात पहिली आलली विभावरी आपटे लगेचच गीतरंगच्या कार्यक्रमातून गाऊ लागली. या सहज, सुरेल आणि गोड गळ्याच्या गायिकेची आतापर्यंत पुष्कळ प्रगती झाली.

असाच एक मराठी गझलांचा कार्यक्रम 'गीतरंग'तर्फे बसवला होता. त्याचे नाव 'रंगवेगळा', सुरेश भटांच्या 'रंग माझा वेगळा' या सुप्रसिद्ध गजलेच्या मुखड्यावरून मला हे नाव सुचले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा. सुरेशचंद्र नाडकर्णी या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाची भेट झाली. नाडकर्णी सरांसारखी बहुआयामी, बहुरंगी माणसे क्वचितच भेटतात. ते मूळचे प्राणिशास्त्राचे

प्राध्यापक. उर्दू शायरीचे पीएच. डी. 'पृथ्वीतलावर माणूस उपराच' सारख्या अनेक गाजलेल्या पुस्तकांचे लेखक. बी.बी.सी.चे क्रिकेट कॉमेन्टेटर. वेगवेगळ्या खेळांसाठी चार भाषात लीलया कॉमेन्टरी करायचे. पं. वसंतराव देशपांडे आणि अख्तरीबाईंच्या प्रदीर्घ सहवासामुळे गाण्याचा त्यांचा गाढा व्यासंग. त्यांना गजाननराव वाटव्यांपासून अनेकांची वेगवेगळी गीते ऐकवली. त्यातून त्यांनी गझला निवडल्या. नवे कलाकार जमवून, कशाचीही अपेक्षा न करता गझलेची वैशिष्ट्ये लोकांपर्यंत पोचवण्याची माझी धडपड त्यांना फार भावली. त्या कार्यक्रमात मी दोन मराठी गझलांना नव्या चालीही लावल्या होत्या. उर्दूमुळे सरांचे मराठी बोलणेही अत्यंत लाघवी. त्यांच्या एखाद्या वाक्यानेही कामाला हुरूप येई. म्हणायचे, 'बेटा, तू कर. मी तुला सगळी मदत करतो.' पाठीशी एवढा वरदहस्त असाताना कार्यक्रम यशस्वी होणार यात शंकाच नाही. त्यांनी मला दहा दिवसांत उर्दू शिकवण्याचे कबूल केले होते. म्हणायचे, 'अरे बेटा, फार सोपी भाषा आहे.' उर्दू भाषा सोपी कशी हे मला अजूनही समजले नाही. बहुधा नाडकर्णीसरांच्या छत्रछायेत साऱ्याच अवघडाचे सोपे होत असावे. त्यांच्याकडून उर्दू शिकण्याची तमन्ना अजूनही माझ्या मनात घर करून राहिली आहे.

सुगम संगीताच्या कार्यक्रमात वाद्यवृंदाचे महत्त्व फार मोठे असते. आमच्यासरख्या नवख्या गायकांच्या कार्यक्रमात तर ते आणखी जास्त. कार्यक्रम आयोजित करताना वादकांच्या तारखा मिळवणे किती जिकिरीचे असते आणि त्यांच्या वेळा सांभाळणे किती कठीण असते हे- जावे त्याच्या वंशा तेव्हाच कळे. या व्यावसायिक वादकांची बिदागीही बरेच वेळा न परवडणारी. पण ते त्यांच्या वादनाने मैफिलीत अप्रतिम रंग भरतात हे मात्र खरे. रिहर्सलही घाईघाईनेच होई. माझ्या मूळच्या शिस्तशीर स्वभावामुळे माझी गाणी चांगली तयार असत. आत्मविश्वास होताच. स्टेजची आणि श्रोत्यांची भीती वाटत नसे. वादकही त्यामुळे माझ्याबरोबर मनमोकळेपणाने वाजवीत. कार्यक्रमातून वारंवार एकत्र आल्यामुळे अनेक वादकांशी माझी बऱ्यापैकी मैत्री जुळली. डॉ. राजेंद्र दूरकर, पं. विजय दास्ताने, मिलिंद गुणे, सचिन इंगळे अशा स्नेह्यांची नावे आठवणीने नमूद करावीशी वाटतात.

इकडे वैद्यकीय व्यवसायाचा व्याप वाढतच होता. कार्यक्रमाच्या रिहर्सलसाठी रात्रीची जागरणे होत. सकाळचा रियाजदेखील न चुकता सुरू असे. त्यामुळे क्लिनिकच्या वेळा चुकू लागल्या. गृहलक्ष्मी नाराज होऊन वेळेच्या योग्य नियोजनाबद्दल बौद्धिके घेऊ लागली. तरीही माझ्या या सर्व धावपळीत आणि छंद जोपासण्याच्या मनस्वी प्रयत्नात पत्नीचे सर्वार्थाने सहकार्य मिळत गेले. सकाळच्या गडबडीत ही ती थर्मासमध्ये गरम पाणी भरून ठेवत असे. कधी गाण्याचे कौतुकही करी. विरोध तर कधीच केला नाही. ती स्वत: महाविद्यालयात शिक्षिका. निर्मल स्वभावामुळे विद्यार्थिप्रिय. पहाटे साडेचारपासून रात्रीपर्यंत ती स्वत:च्या विश्वात रमलेली असते. घराचे व्यवस्थापन तीच समर्थपणे सांभाळे. मुलेही बुद्धिमान, कष्टाळू आणि समजदार. मुलगा तर दहावी-बारावी दोन्ही वेळा बोर्डाच्या मेरीटमध्ये आलेला. मुलगीही कायम शाळेत पहिली-दुसरी. माझ्या गाण्याच्या रियाजामुळे त्यांच्या अभ्यासात कधी व्यत्ययही आला असेल; पण त्यांनी त्याविषयी तक्रार केल्याचे मला आठवत नाही. व्यवसाय आणि गाणे यातील व्यग्रतेमुळे आपण त्यांच्यासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाही अशी मला कायम खंत वाटते. प्रत्येक व्यक्तीच्या यशामध्ये कुटुंबातील सदस्यांची समजूतदार साथ खूप महत्त्वाची असते. मी त्याही दृष्टीने मोठा भाग्यवानच म्हणायचा.

गाण्यातली माझी प्रगती पाहून दीडवर्षातच गुरुजींनी मला गांधर्वमंडळाच्या चौथ्या वर्षाच्या परीक्षेला बसवले. पूर्वीच्या प्रशिक्षणामुळे आणि उपजत जाणिवेमुळे राग चटकन लक्षात येत. परीक्षेला दोन तासांचा एक पेपर होता. त्या वयात प्राथमिक शाळेतल्या अरुंद बाकावर बसून पाठ अवघडून गेली. पेपर सोपा गेला. पुढे प्रॅक्टिकलही छान झाले. त्या परीक्षेला मला सत्याऐंशी टक्के मार्क मिळाले. परीक्षेला बाकी सारी शाळकरी मुले होती. ती मला 'काका' म्हणत. वयामुळे आणि इतर अभ्यासामुळे जी प्रगल्भता येते त्यामुळेच त्यांच्या आणि माझ्या गाण्यात खूप फरक होता. परीक्षेत इतके मार्क मिळाल्याने पुढे शिकत राहणे ओघाने आलेच.

कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करण्याची मला पहिल्यापासूनच सवय आहे. अभ्यासही शक्यतो नियोजनबद्ध आणि शिस्तशीर. प्रत्येक रागासाठी एक स्वतंत्र शंभर पानी वही केली होती. त्यात अनेक पुस्तके धुंडाळून रागाची माहिती, आलापताना आणि चिजा लिहीत असे. पं. विकास कशाळकर एकदा घरी आले असता त्यांना त्या वह्या मी दाखविल्या. त्यांना खूप कौतुक वाटले. एकदा अशाच विदूषी प्रभा अत्रे घरी आल्या होत्या. माझे वडील वकिली शिकत असताना. शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी शाळेत नोकरी करायचे. तेव्हा ते प्रभा अत्र्यांची शिकवणीही करायचे. पुढे त्या मोठ्या गायिका झाल्या तरी मुंबईला आमच्या घरी त्यांचे जाणे येणे असे. त्यांनाही माझ्या वह्या मी दाखवल्या होत्या. स्वर लिहिण्यापेक्षा गाऊन रेकॉर्ड केले तर जास्त बरे असे त्यांनी सुचवले. पुढे पाच-सहा वर्षांनी एकदा भेट झाली तेव्हाही त्यांनी त्या वह्यांची आठवण काढली. तोपर्यंत मी त्यांची सूचना अमलात आणून रागांचे रेकॉर्डिंग करू लागलो होतो. अजूनही त्यांना माझ्या वह्या आठवतात याचे मला तेव्हा मोठे आश्चर्य वाटले.

एकेका रागाच्या वेगवेगळ्या गायकांच्या गायनाच्या अनेक कॅसेट्स मी बनवून घेतल्या होत्या. घरात, गाडीत, क्लिनिकमध्ये सतत त्यांचे पारायण सुरू असे. अशा व्यासंगामुळे रागाचे स्वरूप पक्के लक्षात येई. बरेच गायक-गायिका सुरेल असतात पण तालाला कच्चे. ताल चुकला की मग विश्वास डळमळीत होतो आणि गाणे पडते. ताल पक्का व्हावा म्हणून पं. विजय दास्ताने यांच्याकडे दीडेक वर्ष तबला शिकलो. तेही हाडाचे विद्यार्थी. अजूनही पर्वतकर गुरुजींकडे शिकतात. साथीचा तबला वाजवता यावा म्हणून रोज एखाद्या

कलाकाराच्या रियाजसाठी तासभर देतात. माझ्याकडे त्यांचा शनिवार ठरलेला. खरे तर त्यासाठीच मी हळूहळू शनिवारचे क्लिनिक बंद केले.

पेटी वाजवीत गाता यावे म्हणून वर्षभर तीही शिकण्याचा प्रयत्न केला. पण शास्त्रीय संगीताच्या अभ्यासामुळे हळूहळू सुगम गाणे मागे पडू लागले. 'गीतरंग'च्या कार्यक्रमासाठी हॉल ठरवणे, गाणी निवडणे इथपासून तिकिट विक्री, जाहिरात आणि जमाखर्चापर्यंत तारेवरची कसरत करावी लागे. आम्ही गायक गायिका पैसे घेत नसू. तरीही खर्च भागवण्यासाठी कोणीतरी प्रायोजक मिळवावा लागे. एवढे सारे गायक-वादक एकत्र जमवणेही अवघड. व्यवसाय सांभाळून हे सारे संयोजन मला एकट्याला जमेना. त्यामुळे अळवावरच्या पाण्याप्रमाणे गीतरंगचे कार्यक्रम बंद झाले आणि मीही पुरता शास्त्रीय गायनाकडे वळलो. शास्त्रीय गाण्याच्या रियाजला हल्ली इलेक्ट्रॉनिक तबला, तंबोरा मिळतात. त्यामुळे साथीदारांसाठी अडून राहत नाही. आपल्या सोईच्या वेळी केव्हाही अर्धा-एक तास रियाज झाला की सारा शीण निघून जातो, मन:शांती मिळते आणि नवा उत्साह संचारतो.

मी राहतो तेथून जवळच गुरुजींचे घर असल्यामुळे शिकवणी नियमाने होत असे. सकाळी रियाज आणि व्यायाम आटोपून नित्यकर्मानंतर शिकवणी झाली की मगच मी व्यवसायास सुरुवात करी. दुपारी थोडी विश्रांती घेऊन रात्री क्लिनिकहून परतल्यावर पुन्हा थिअरीचा अभ्यास चाले. त्यामुळे दरवर्षी पुढची परीक्षा उत्तम प्रकारे पास होऊन त्यानंतरच्या तीन वर्षांत २००३ साली संगीत विशारद ही परीक्षा ऐंशी टक्के गुण मिळवून पास झालो. सात वर्षांचा हा कोर्स साडेचार वर्षातच संपला. विद्यालयात विशारदला आतापर्यंत एवढे मार्क कुणाला मिळाले नव्हते. त्यासाठी मला वासुदेवराव कुलकर्णी पारितोषिक मिळाले.

गाण्याच्या अभ्यासात रियाज आणि मंचप्रदर्शनाचे महत्त्व फार. पं. ओंकारनाथ ठाकुर म्हणत त्याप्रमाणे, 'आवाज म्हणजे एखादे धातूचे पात्र आहे. घासाल तितके चमकते. न घासले तर मलिन.' त्यामुळे याच काळात 'गाईल त्याचा गळा' या उक्तीनुसार गात राहिलो. दरवर्षी भाजीराम मंदिरात रामाचा आणि वंजारी विठ्ठल मंदिरात कृष्णाचा विद्यालयातर्फे उत्सव असे. रोज दोन-तीन विद्यार्थ्यांची गाणी असत. एखादा अनुपस्थित राहिला की आयत्या वेळी गुरुजी मला गायला बसवीत किंवा स्वत: गात. त्या काळीही पूर्वतयारीशिवाय अर्धापाऊण तास मी सहज गाऊ शकत असे. असाच एकदा आयत्या वेळचा बागेश्री फार छान झाला होता. गुरुपौर्णिमा, इतर विद्यालयांचे समारंभ, गुरुजींच्या मैफिली याखेरीज काही घरगुती कार्यक्रम असत. एकदा तर दोन्ही हात प्लॅस्टरमध्ये असताना मिया मल्हार गायलो. २००० साली भाजीराम मंदिरात पहिल्यांदा भूप गायलो तेव्हा गुरुजींनी भरभरून शाबासकी दिली. आपण कोणीतरी महान गायक होणार अशी स्वप्नेही पडू लागली. पण पुढल्या वर्षी त्याच ठिकाणी जयजयवंती इतका वाईट झाला की आता आपले कसे होणार या विचाराने बरेच दिवस मला रात्रीची झोप लागत नसे.

९९ साली घराच्या नूतनीकरणाचे मोठे काम जवळ जवळ वर्षभर चालले होते. बांधकामाची धूळ आणि कामगारांशी वादविवाद यांमुळे आवाज बिघडे. मुलांचा अभ्यास पत्नीच पाहत असे. पण त्यांच्या परीक्षांच्या काळात मात्र मी आपणहूनच सकाळचा रियाज टाळत असे. आईचे पोटाचे एक मोठे ऑपरेशन झाले. कामाच्या ताणामुळे पेंग येऊन नव्या गाडीचा एक मोठा अपघात झाला. दोन्ही हात प्लॅस्टरमध्ये गेले. सहा आठवड्यानंतर प्लॅस्टर निघाले तरी पुढे तीन-चार महिने मनगटाजवळ दुखत राहिल्याने तंबोऱ्याच्या खुंट्या पिळता येत नसत. वडिलांच्या आजारपणात मानेचा स्पॉन्डिलायटिस बळावला. इतका की डावा हात लटका पडे. गाडीसुद्धा रिव्हर्स गियरमध्ये मागे घेता येईना. त्यामुळेच ड्रायव्हरची नेमणूक करावी लागली. त्याआधी गाडीत तंबोऱ्याची कॅसेट लावून मी ताना घोटीत असे. तो गाडीतला रियाज मात्र ड्रायव्हरमुळे बंद पडला.

याच काळात गुरुजींनी न शिकवलेल्या अनेक चीजांचा संग्रह केला. काही नव्या गीतांना चाली लावल्या. जौनपुरी, सारंग अशा रागात नव्या चीजाही बांधल्या. 'यश नारायण' हा नवा रागही तेव्हाच बांधला. यशवंत हे माझे वडील आणि नारायण हे माझे गुरू. शंकरा रागात गांधार आणि निषाद कोमल करून हा राग मी बनवला होता. पुढे भारत गायन समाजात यशनारायण गायलो तेव्हा विशारदही उत्तीर्ण नसलेल्या विद्यार्थ्याने बांधलेला नवा राग ऐकून श्रोत्यांना मोठे कौतुक वाटले. ते सारे दिवस गाण्याने मंतरलेले असेच होते. विद्यालयाचा सुवर्णमहोत्सव आणि गुरुजींची पंचाहत्तरी साधून वर्षभर दरमहा गायनाचे कार्यक्रम घडवले. त्या वर्षी ग्वाल्हेर गायकीवर एक परिसंवादही घडवून आणला. त्या निमित्ताने ग्वाल्हेर गायकीवर एक पुस्तिका लिहून प्रसिद्ध केली. ही पुस्तिका लिहिताना पं. विकास कशाळकरांची मोठी मदत झाली. पण पुस्तिकेवर लेखक म्हणून त्यांचे नाव छापायला त्यांनी नेहमीच्या विनयाने नकार दिला. 'ज्ञानाने नम्रता येते' या उक्तीचे पं. विकास कशाळकर हे चालते बोलते उदाहरणच. माझ्या कोणत्याही विनंतीला त्यांनी कधीही नकार दिला नाही. याच वर्षी 'गान नारायण' नावाचे गुरुजींच्या गौरवपर पुस्तक संपादित केले. कला आणि कलाकारांची सेवा केल्याने आपल्या पदरी काही ज्ञानकण पडतील या श्रद्धेने सवाईगंधर्व महोत्सवात स्वयंसेवकही झालो. रात्री-अपरात्री पं. फिरोज दस्तूर किंवा पंडिता गंगूबाई हनगल यांना गाडीतून नेले की त्या महान कलाकारांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली माझी गाडीच मला एखाद्या स्वरदेवतेसारखी भासे!

विशारदची शेवटची परीक्षा जवळ आली असताना वडिलांना मेंदूत रक्तस्राव झाला. ते न्यायाधीश होते. रिटायरमेंटनंतर मुंबईलाच वकिली करीत. आदल्या दिवशी कोर्टात आरग्युमेंटही करून आले होते. बेशुद्धावस्थेतच त्यांना मुंबईहून पुण्याला आय.सी.यूमध्ये ठेवले. ते जवळजवळ अडीच

महिने बेशुद्ध होते. रोज तब्येतीत चढउतार होई. हॉस्पिटलमध्येच मी रात्री परीक्षेचा अभ्यास करायचो. गाण्याचा ध्यासच मला त्या अवघड काळात उपयोगी पडला. त्यांच्या आजारपणातच थिअरी आणि प्रॅक्टिकल झाले. पुढे ते दिवंगत झाले त्या दिवशी डिस्टिंक्शनचा रिझल्ट आला. उत्तम मार्क ही त्यांना वाहिलेली श्रद्धांजलीच. लहानपणी बालगंधर्वांचे गाणे पुष्कळ ऐकले असल्याने त्यांना गाणे कळत असे. सकाळी ते पेपर वाचीत असताना माझा रियाज सुरू असे. रोजच्या रियाजने तुझा गळा हळूहळू सुधारतोय असे म्हणत असत. कधी गाण्यात वेळ घालवून बुद्धिमत्ता आणि अनुभव असूनही वैद्यकीय व्यवसायाचे नुकसान करतो असा त्रागाही करायचे.

गाण्याच्या छंदाचा अतिरेक झाला. जणू गाण्याचे व्यसनच जडले. अहोरात्र गाण्याचाच ध्यास आणि गाण्याचाच श्वास अशी कठीण अवस्था होऊन बसली. आतापर्यंत वैद्यकीय व्यवसाय चांगलाच स्थिरावला होता. आणखी वाढवण्याचा कोणता मार्ग नव्हता. तशी इच्छा, अपेक्षाही नव्हती. गाण्याच्या वेडाखातर हळूहळू शनिवारचे क्लिनिक बंद केले. दिवसभर गाणेच. अधूनमधून कार्यक्रमही सुरू असत. दरम्यान एका हितचिंतक मित्राने पत्र लिहून गाण्याच्या अतिरेकी नादामुळे वैद्यकीय पेशाकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल तक्रारही केली होती. तो त्याचा मित्रकर्तव्य म्हणून इशारा देऊन सावध करण्याच प्रयत्न होता. पण मी गानधुंद अवस्थेत वाहत चाललो होतो. अखेर 'अती तेथे माती' असेच झाले. २००२ साली विशारदच्या पहिल्या परीक्षेनंतर अतिगाण्यामुळे गळा बिघडला. वरचे स्वर लागेनात. थोडेसे गायले तरी घसा दुखे. वैद्यकीय तपासणीत घशात गाठ झाल्याचे निदान झाले. उगाच मनात कॅन्सरची पाल चुकचुकली आणि गाणे बंद झाले.

अल्लादियाखाँ, सवाई गंधर्व, पं. जितेंद्र अभिषेकी यांचेही आवाज पूर्वी बिघडले होते. त्यांनीही त्यांचे गाणे प्रयत्नपूर्वक सुधारले होते. म्हणजे आवाज सुधारण्याची आशा होती. आत्मविश्वासाने प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हा माझा स्वाभाव आणि परमेश्वरही प्रामाणिक प्रयत्नांना नेहमी यश देतो असा दृढविश्वास. त्या दृष्टीने मी या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधू लागलो. चुकीच्या किंवा अतिरेकी व्यायामाने जशी लचक भरते तसेच आवाजाच्या चुकीच्या किंवा अतिरेकी वापरामुळे घशात गाठी होतात. 'बोलतो तसे गा' असे अल्लादियाखाँ म्हणत. गाण्यात सहजपणा पाहिजे. आपली गाण्याची पद्धत बदलण्यासाठी मी देवधरांच्या पुस्तकापासून आवाजसाधनेचा (Voice culture) अभ्यास सुरू केला. इतरही पुस्तके वाचली. थोरामोठ्यांच्या रियाजच्या पद्धती समजण्यासाठी त्यांची चरित्रे अभ्यासली. आवाज सुधारण्यासाठी ओंकार साधना केली. ओंकार चांगला जमावा म्हणून योगासने आणि प्राणायमही शिकलो. योग विद्यापीठाच्या परीक्षा दिल्या. योगासने आणि प्राणायामाने दमसासही चांगला सुधारतो. कंठसाधनेच्या या अभ्यासातून 'कंठयोग' हे पुस्तकही तयार झाले. एक पट्टी उतरवून मी पुन्हा थोडा थोडा गाऊ लागलो. घशाची सूज ओसरली. गाठी गेल्या आणि आवाज सुधारला. विशारदची शेवटची परीक्षा मी अशी खालच्या पट्टीत देऊनही डिस्टिंक्शन मिळवू शकलो.

या अवघड काळात पं. ना. वा. दिवाणांचा मोठा आधार मिळाला. ते स्वत: संगीताचार्य. पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ विद्यार्थी घडवण्याचा त्यांचा अनुभव. प्रत्येक विद्यार्थ्याचा वकूब ओळखून शिकवण्याची त्यांची पद्धत वाखाणण्याजोगी. विद्यार्थी कितीही वेळा चुकला तरी न कंटाळता शांतपणे पुन:पुन्हा तीच जागा शिकवीत असत. कधी कंटाळा नाही. जोरात बोलणे नाही, कुणावर रागावणे नाही आणि कुणाला नावे ठेवणे नाही. भारतातल्या सर्वांत मोठ्या परीक्षाकेंद्राचे ते संचालक. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात अभिजात संगीताचा प्रसार करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे यात शंकाच नाही. मीही त्यांचा आवडता विद्यार्थी. त्यांच्या किती तरी रंगतदार मैफिलींना मी क्लिनिक बुडवून तानपुऱ्याची साथ केली.

विशारदनंतर पुणे विद्यापीठात एम. ए. करायची माझी फार इच्छा होती. त्या दृष्टीने अहिरभैरव, मारुबिहाग वगैरे रागांची तयारीही सुरू केली. परंतु एम. ए. म्हणजे पूर्ण वेळाचा अभ्यासक्रम. म्हणजे क्लिनिकला टाळेच ठोकावे लागले असते. व्यावहारिकदृष्ट्या ते मला शक्य नव्हते. त्यातच २००३ साली एका आयुर्वेद महाविद्यालयात विभागप्रमुख म्हणून माझी नेमणूक झाली. एकेका लेक्चरच्या तयारीसाठी बराच वेळ लागे. लेक्चर्स उत्तम व्हायची. आयुर्वेदाला ॲलोपॅथीची जोड दिलेल्या माझ्या व्यासंगपूर्ण व्याख्यानांना इतर विषयांचे अध्यापकही आवर्जून हजेरी लावत. आपल्या अभ्यासाचे सार्थक झाल्यासारखे तेव्हा मला वाटत असे. पण आयुर्वेदाच्या या व्यग्रतेमुळे गाण्याला वेळ कमी पडू लागला. गुरुजींच्या शिकवणीचे तास कमी करावे लागले. आणखी एक नवीनच अडचण उपस्थित झाली. अति अभ्यासामुळे गाण्याच्या छंदाचा आता व्यासंग झाला होता. गाणे ऐकताना त्याच्या योग्य अयोग्यतेविषयी चिकित्सकपणा वाढू लागला. जिज्ञासेचा, रसिकतेचा प्रवास समीक्षेकडे होऊ लागला. गाणे ऐकत काम करणे जमेना. त्यामुळे गाणे ऐकणेही बंद झाले. जणू माझ्या गाण्याला ग्रहणच लागले.

आज हे सगळे सांगायला सोपे वाटते आहे. पण ते प्रत्यक्षात घडत होते तेव्हा खूप तारांबळ उडे. आयुर्वेद महाविद्यालयात वर्षभराचा अभ्यासक्रम पुरा झाला. पुढच्या वर्षी तोच अभ्यासक्रम शिकवायचा असल्यामुळे अभ्यासाचा ताणही बराच कमी झाला. तेव्हा महाविद्यालयाच्या संचालकांनी संधिवातासाठी आयुर्वेदिक औषधांवर काही संशोधन प्रकल्प सुरू करावा असे सुचविले. मलाही आयुर्वेदातल्या संशोधनाची आवड. कारण त्यामुळे त्याविषयाचा मुळापासून अभ्यास होतो. मी नेहमीच्या उत्साहात आनंदाने होकार दिला. आता त्यासाठी ऱ्हुमॅटॉलॉजी म्हणजे संधिवात निवारणशास्त्राचे प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक होते. त्याशिवाय आयुर्वेदिक औषधांना नव्या

वैज्ञानिक संशोधनपद्धती लावता आल्या नसत्या. त्यासाठी मुंबईला डॉ. व्ही. आर. जोशी यांना भेटलो. आयुर्वेदातले जसे पुण्याचे वैद्य य. गो. जोशी आणि मुंबईचे वैद्य धों. स. अंतरकर हे माझे गुरू तसेच ॲलोपॅथीत डॉ. व्ही. आर. जोशींना मी गुरूस्थानी मानतो. वै. य. गो. जोशींनी मला प्रॅक्टिकल आयुर्वेद शिकवला. त्यांच्या घरी पहाटे आम्ही दोघे चरक वाचत असू. वैद्य अंतरकरांनी मला आयुर्वेदाकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहायला शिकवले. डॉ. व्ही. आर. जोशींकडे मी ८० साली सहा एक महिनेच काम केले; पण तेवढ्यात त्यांनी मला पेशंटकडे पाहण्याची दृष्टी दिली. शेवटी गुरूच आपल्या विद्यार्थ्याला घडवत असतो. दिवाणसर आणि जोशीसर यांच्यात मला बरेच साम्य दिसते. भारतात ज्या मोजक्या शिक्षकांनी ऱ्हुमॅटॉलॉजीचा पाया रचला त्यांपैकी एक म्हणजे डॉ. व्ही. आर. जोशी. अत्यंत ज्ञानी, शांत, विनम्र स्वभावाचे. सतत कार्यमग्न रुग्णांची अगदी तपशीलवार तपासणी करून नेमके निदान शोधण्यास वाकबगार. काही अडले तर एका रात्रीत माहिती शोधून दुसऱ्या दिवशी उत्तर तयार. अलीकडेच रॉयल कॉलेजने त्यांना फेलोशिप दिली. कशाचा गर्व नाही. लोभ नाही. त्यांच्यासमोर आपल्याला कोट घालायचीसुद्धा लाज वाटते. माझ्या घरी एकदा आले होते तेव्हा पत्नीच्या हातचा चहा आवडला म्हणून तेवढाच काय तो पुन्हा मागून घेतला. मला काही अडले की मी त्यांना फोनवर विचारतोही. आजही त्यांनाच आदर्श मानून एकलव्याच्या निष्ठेने माझा व्यवसाय सुरू आहे.

डॉ. व्ही. आर. जोशी आताशा पूर्वीइतके काम करीत नाहीत. त्यांच्या सल्ल्याने मी २००५ साली मार्चपासून मुंबईला केईएम हॉस्पिटलमध्ये ऱ्हुमॅटॉलॉजीचे प्रशिक्षण घेऊ लागलो. आठवड्यातून दोनदा पहाटे उठून नऊपर्यंत मुंबईला पोचायचे, दिवसभर हॉस्पिटलमध्ये काम करायचे आणि रात्री केव्हातरी परतायचे असा नवा उद्योग सुरू झाला. क्लिनिकला दांडी झाली, की दुसऱ्या दिवशी पुण्यात पेशंट्सची दुप्पट गर्दी होत असे. हे मुंबईतले प्रशिक्षण वर्षभर चालले. पण ऱ्हुमॅटॉलॉजीच्या स्पेशालिस्टच्या कमतरतेमुळे पाचव्या महिन्यातच एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये माझी नेमणूक झाली. दोन तपांपूर्वी एम. डी. शिकताना मी अभ्यासलेली ऱ्हुमॅटॉलॉजी आणि आताचे ज्ञान यात जमीन आसमानाचा फरक झालेला. नवनव्या निदानपद्धती आणि जादूसारखी काम करणारी औषधे यांमुळे संधिवाताकडे पाहण्याचा दृष्टिकोनच पूर्णपणे बदलून गेला आहे. त्यामुळे ऱ्हुमॅटॉलॉजीचा पुन्हा सर्व अभ्यास करणे क्रमप्राप्त होते. महाशिवरात्रीला एक सुंदर वही घेऊन ऱ्हुमॅटॉलॉजीची टिपणे काढायला सुरुवात केली. मुंबईच्या विभागप्रमुखांना माझ्या नोट्स इतक्या आवडल्या की त्या त्यांनी पुढच्या विद्यार्थ्यांसाठी विभागाच्या ग्रंथालयात ठेवून घेतल्या. प्रशिक्षणाची कोणतीही संधी मी सोडीत नसे. त्यामुळे भारतात आणि भारताबाहेर जेथे कोठे ऱ्हुमॅटॉलॉजीचा परिसंवाद किंवा कार्यशाळा असेल तेथे मी जाऊ लागलो. हॉस्पिटलचे काम वाढले. दुपारची विश्रांती बंद झाली. दिवसभरात चाळीस पन्नास पेशंट तपासून रात्री घरी आल्यावर बोलायचेसुद्धा त्राण उरत नसे. त्यामुळे रात्रीच्या अभ्यासही संपला.

गाणे आणि वैद्यकीय व्यवसाय यांचा बहुधा व्यस्त संबंध असावा. मी संगीत अलंकार तरी करावेच अशी गुरुजींची फार इच्छा होती. मी केव्हातरी संगीतात डॉक्टरेट करीन अशी आजही त्यांना आशा वाटते. एम. ए. नाही तर संगीत अलंकार करण्याचा मीही मग निर्णय केला. पहिल्या परीक्षेला पंचवीस रागांचा अभ्यास होता. शिकवणी आता आठवड्यातून एकदाच असे. कमी वेळामुळे तयारी अपुरी राहिली आणि पहिल्या वर्षी परीक्षेला बसण्याचे धाडस झाले नाही. सकाळचा रियाज मात्र मी शक्यतो चुकवीत नसे. पेशंटचा व्यत्यय नको म्हणून त्या वेळी फोनही बंद ठेवी. रियाज कमी पडला की चिडचिड होई. असे आणखी एक वर्ष गेले. राग सारे शिकून झाले होते. विशारदपर्यंतच्या भरपूर अभ्यासामुळे स्वर समजले की रागाची मांडणी सहज साधत असे. दर शनिवार रविवार थोडा थोडा करून थिअरीचाही पुष्कळसा अभ्यास झाला होता. त्या बैठकीमुळे सोमवारी कंबरदुखीसाठी हमखास गोळी घ्यावी लागत असे. असो. २००५ साली नोव्हेंबरला मी मोठ्या आत्मविश्वासाने अलंकारच्या पहिल्या परीक्षेला बसलो. थिअरी नेहमीप्रमाणे उत्तम झाली. त्यानंतर हैदराबादला चारपाच दिवस ऱ्हुमॅटॉलॉजीची कॉन्फरन्स होती. आल्यावर भाच्याच्या लग्नात वेळ गेला. प्रॅक्टिकलला गुजरी तोडी बरा झाला. खरे तर गुजरी तोडी रंगवायला अवघड असल्याने विभास वगैरे गावे असे गुरुजींनी आधीच सुचवले होते. पण माझा फाजील आत्मविश्वास नडला. गाण्याच्या परीक्षेत सुरुवातीलाच काही कमी पडले की पुढे नीट भट्टी जमत नाही. भैरवबहार रागासंबंधी परीक्षकांशी तात्त्विक मतभेद झाले. मी गात होतो ती चीज विनायकबुवांच्या पुस्तकातलीच होती. दिवाणसरांनीही स्वत: तेथे येऊन ग्वाल्हेर गायकीत भैरवबहार असाच गातात असे सांगितले. तरीही त्या परीक्षकांचे समाधान झाल्यासारखे वाटले नाही. परिणामी थिअरीत भरपूर मार्क मिळवून पहिला येऊनही प्रॅक्टिकलला मी नापास झालो. तसे अपयश मी बरेच पचवले आहे. पण गाण्याच्या परीक्षेतले हे अपयश पहिलेच.

मुंबईचे ऱ्हुमॅटॉलॉजीचे प्रशिक्षण पूर्ण झाले. तीन-चार महिन्यातच पुण्यातल्या सगळ्या मोठ्या हॉस्पिटल्समध्ये माझी नेमणूक झाली. आयुर्वेद महाविद्यालयाची प्राध्यापकी सुटली. देशविदेशचे परिसंवाद, प्रशिक्षण आणि प्रॅक्टिस यात पुरता गढून गेलो. ऱ्हुमॅटॉलॉजी या सुपरस्पेशालिटीविषयी समाजात मोठे अज्ञान आहे. त्यामुळे वृत्तपत्रे आणि नियतकालिकातून लिखाण, ज्येष्ठ नागरिक संघात भाषणे, फॅमिली डॉक्टर्स आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने असा नवा उद्योग सुरू झाला. त्यासाठी कॉम्प्युटरचा दीड-दोन महिन्यांचा कोर्स केला. युरोपियन लीगच्या ऱ्हुमॅटॉलॉजीच्या ऑन लाईन कोर्ससाठी या प्रशिक्षणाचा खूप उपयोग झाला. इंटरनेटचा सहज वापर करू लागलो. त्यामुळे एखाद्या अवघड केसविषयी सहज माहिती

मिळवता येऊ लागली. अशाच काही क्वचित आढळणाऱ्या माझ्या केसेस मी मुंबई ऱ्हुमॅटॉलॉजी सोसायटीच्या मासिक सभेतही दाखवल्या.

सकाळचा रियाज आणि शनिवारची बैठक यांच्या जोरावर मी पुढच्या वर्षी अलंकारची पहिली परीक्षा पास झालो. माझ्या एका गुरुभगिनीचे वडील प्रत्यके मैफिलीनंतर कौतुक करीत. डॉक्टरकी सांभाळून मी माझे गाणे एवढे कसे वाढवले याचे त्यांना आश्चर्य वाटे. विज्ञान आणि कला या दोन्ही क्षेत्रात सतत तळ्यात आणि मळ्यात असा संचार करताना अनेकदा असे वाटते की जीवनाच्या कोणत्याही दोन क्षेत्रात द्वैत नसतेच. संधिवाताचा एखादा रुग्ण तापासताना, ऱ्हुमॅटॉलॉजीच्या कार्यशाळेत एखाद्या परदेशी वक्त्याचे भाषण ऐकताना, रंगमंचावर पूरियाधनाश्री गाताना किंवा गुरुजींकडून यमनीबिलावल शिकताना माझ्या मनाची तल्लीनता एकसारखीच असते. हातातले काम एकाग्रतेने करत राहिले की सारे काही जमते. आणि आपण आपल्या मूळ स्वभावाला न्याय दिला की अशक्य काहीच नाही.

अलंकारची आता एकच परीक्षा राहिली होती. पुन्हा पंचवीस राग होते. त्यातले काही गुरुजींनी आदल्या वर्षीच शिकवले होते. गुरुजींनाही माझ्या वेळेच्या ओढाताणीची कल्पना होतीच. त्यामुळे केव्हाही गेलो तरी ते मला शिकवीत. अलंकार पूर्ण झालेच पाहिजे असा जणू काही त्यांचा आदेशच होता. सर्व रागांची माहिती मी एका खिशातल्या वहीत लिहून ठेवली होती. तेवढीच काय ती जातायेता गुणगुणत असे. सकाळचा रियाज मात्र नियमित. या परीक्षेचा आता काय उपयोग असेही विचार कधीकधी मनात येत. जे ध्रुपद-धमार आपण पुढे कधीही गाणार नाही ते का पाठ करायचे? उगाचच आडाचौतालाची तिगुण करण्याची खटपट का करायची? जो अनवट राग सहजपणे गाता येत नाही आणि समोरच्या श्रोत्याला उमजत नाही तो गळ्यावर चढवण्यासाठी का मेहनत करायची? गाण्यामुळे वैद्यकीय व्यवसायाचे नुकसान झाले. फी, वाद्ये, कॅसेट्स, पुस्तके यांवर सुमारे लाखभर रुपये खर्च झाले. मैफिलीत मांडी घालून डावा गुडघा दुखावला. कौटुंबिक आणि सामाजिक कर्तव्यांमध्ये कसूर झाली. मुले आणि पत्नी यांच्यावर अन्याय झाला. आणि गेलेल्या वेळेची किंमत कशी करणार? परीक्षेमुळे शिस्तशीर अभ्यास होऊन शास्त्र चांगले कळते. गाणे शिकण्यासाठी काही ध्येय राहते. पुष्कळ राग समजले की आपोआपच स्वरज्ञान होते. आणि सुगम गाणे स्टेजवर गाऊन टाळ्या मिळवता येत असल्या तरी अभिजात शास्त्रीय संगीताची ताकद गुंग करून टाकणारी आहे. गळ्याला वयाच्या मर्यादा असतात हे मात्र खरे. स्मरणशक्तीवरचा विश्वासही कमी होऊ लागतो. एवढे गाणे जर मी तरुणपणी शिकलो असतो तर कदाचित आतापर्यंत एखादा मोठा गवई झालो असतो अर्थात, त्यावर संसार चालला असता की नाही कुणास ठाऊक!

पाहता पाहता पुण्यातल्या आठ हॉस्पिटल्समध्ये मी संधिवाताचे काम पाहू लगलो. सकाळी रियाज आणि योगासने उरकून घराबाहेर पडलो की सतत दहा-बारा तास पेशंट्सशी बोलावे लागे. दिवसाचे दोन्ही डबे गाडीतच जेवावे लागू लागले. मात्र शेवटच्या परीक्षेआधी तीन चार महिने प्रत्येक शनिवार-रविवार मी गाण्याचाच अभ्यास करू लागलो. गणपती आणि दिवाळीच्या सुट्ट्या अभ्यासासाठी वापरल्या. एवढेच नाही तर खजुराहोच्या ऱ्हुमॅटॉलॉजी कॉन्फरन्सलाही मी गाण्याचीच पुस्तके घेऊन गेलो होतो. लेखी परीक्षेआधी चार दिवस मुलीच्या खोलीत स्वत:ला कोंडून घेऊन सर्व अभ्यास पुरा केला. बाहेरगावी गेल्याचे सांगून तेव्हा मी रजा घेतली होती. पेपर चांगले गेले. प्रॅक्टिकलला पं. रातांजनकरांचे एक ज्येष्ठ शिष्य परीक्षक होते. अत्यंत ज्ञानी आणि मनमोकळे. माझ्या आधीच्या विद्यार्थ्याच्या कमी तयारीमुळे जरा वैतागलेले होते. पण मी गायलेला अहिरभैरव त्यांना खूप आवडला. पूर्वी 'रंग वेगळा' साठी मी चाल लावलेली अमृतेश्वरांची पहिली मराठी गझलही त्यांना आवडली. परीक्षा जवळ जवळ तीन तास चालली होती. पुढे रिझल्ट आला तेव्हा मी उत्तम गुणांनी पास झालो होतो. वयाची पंचावन्न वर्षे झालेली. अखेर मी संगीत अलंकार झालो.

शिकत राहणे हा माझा छंद आहे. नवे शिकले नाही तर माणसाच्या मेंदूतल्या ज्ञानकणांवर गंज चढतो. गाणे शिकत राहिलो म्हणूनच आयुर्वेदाचा नव्याने अभ्यास झाला आणि म्हणूनच ऱ्हुमॅटॉलॉजीतही प्रावीण्य मिळवले. नेमका सूर लावण्यासाठी फार एकाग्रता लागते. तीच एकाग्रता संसारातले आणि व्यवसायातले अवघड प्रश्न चुटकीसारखे सोडवायला उपयोगी पडते. सकाळी रियाज झाला की मन अगदी शांत आणि ताजेतवाने होते. दिवसभर कितीही काम करायला मग शरीरही उत्तम साथ देते.

संगीताचा आंनद अवर्णनीय खराच, पण स्ट्रेचरवरून आलेला संधिवाताचा रोगी आपल्या उपचारांनी चालू लागल्याचे पाहून वाटणारे समाधानही शब्दात व्यक्त करता येत नाही. ज्या हेतूने मी गाणे शिकू लागलो तो साध्य करणे आता व्यवसायाच्या व्यापामुळे शक्य नाही. अलंकार परीक्षेनंतर माझी एक गुरुभगिनी रडली. गुरुजींकडचे शिक्षण संपले म्हणून शाळा सोडताना मुले रडतात तशी. मी मात्र परीक्षेनंतर लगेचच आधी शिकलेल्या रागातले पंचवीस-तीस राग आकाशवाणीच्या ऑडिशनसाठी निवडले आणि यमन रागाचा रियाज सुरू केला. नऊ वर्षांच्या अभ्यासानंतर मी आता त्याच रागांकडे वेगळ्या दृष्टीने पाहू शकतो. गाणे शिकण्यास पुन्हा सुरुवात झाली आहे. केशवराव भोळ्यांचे ते वाक्य मला पुन:पुन्हा आठवते, 'पदवी मिळाली, आता शिक्षण सुरू कर.'

◆

डॉ.श्रीकांत वाघ । लुपस क्लिनिक, १०७८, शुक्रवार पेठ, टिळक रस्ता, हिराबाग, पुणे-४११००२ फोन : २४४७८९९३ (क्लिनिक) २४२१२११९ (निवास)